# १० महिने, १५ टक्के काम

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

- मेट्रो ३च्या पहिल्या टप्प्याचे ८५ टक्के पूर्ण
- डिसेंबर महिन्यात वाहतूक सुरू करण्याचे लक्ष्य



राज्यातील पहिल्या भूमिगत मेट्रो ३ समोर दहा महिन्यांमध्ये उर्वरित १५ टक्के काम पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. हा पहिला टप्पा डिसेंबर २०२३ मध्ये सुरू करायचा असून अद्याप ८५ टक्के कामेच पूर्ण झाली आहेत.

मेट्रो ३ ही मुंबईच्या पश्चिम उपनगरांना उत्तर-दक्षिण जोडते. उत्तरेकडे आरे (सारिपूतनगर) ते दक्षिणेकडे कफ परेडपर्यंत ही मार्गिका आहे. मार्गिकेचा पहिला टप्पा आरे ते बीकेसीतील प्राप्तिकर कार्यालय मेट्रो स्थानक, असा असेल. तर दुसरा टप्पा बीकेसी ते कफ परेड असेल. वास्तवात पहिला टप्पा मागील वर्षीच सुरू होणे अपेक्षित होते. आरे कारशेडसंबंधी वादामुळे त्यास विलंब झाला. हा टप्पा डिसेंबर २०२३मध्ये सुरू करण्याचे लक्ष्य प्रशासनाने निश्चित केले आहे. ते गाठण्यासाठी १५ टक्के काम तातडीने करावे लागणार आहे. ही मार्गिका मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन उभी करीत आहे. कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या टप्प्याचे काम ८५.६ टक्के तर दुसऱ्या टप्प्याचे कमा ७६ टक्के पूर्ण झाले आहे. एकूण कामांचा विचार केल्यास ती ९१.३ टक्के, स्थानकांची उभारणी ८८.७० टक्के, रुळांची उभारणी ५५.६० टक्के पूर्ण झाली आहे. भुयारीकरण १०० टक्के पूर्ण झाले आहे. मार्गिकेतील सर्वात मोठे आव्हान प्रणालीशी संबंधित कामांबाबत आहे. ही प्रणाली आरे कारशेडमध्ये उभी करायची आहे. कारशेडच्या उभारणीत आंदोलनाचा अडथळा आल्याने त्यास विलंब झाला. त्यामुळेच ही कामे सद्यस्थितीत ४७.५० टक्केच पूर्ण झाली आहेत. डिसेंबर २०२३मध्ये पहिला टप्पा सुरू करणे अपेक्षित असताना मोठ्या प्रमाणावर कामे बाकी असणे, हे आव्हानात्मक आहे. यामुळेच अस्थायी स्वरूपात ही कामे बीकेसी स्थानकातून करण्याची तयारीही एमएमआरसीने सुरू केली.